# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART – TWO


(असाधारण)

**सोमवार, दिनांक २९ जानेवारी, २०१८**

## अधिसूचना

क्र. : ८/२०१८ दिनांक - २९.१.२०१८

**विषय : व्यवस्थापन परिषदेवरील प्रारंभिक आरक्षणाचा बिंदू.**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३०(४)(च), (छ), (ज), (झ) नुसार व्यवस्थापन परिषदेवरील प्रतिनिधीत्व करणाऱ्या प्राचार्य, अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधरांचे प्रारंभिक आरक्षण बिंदू निश्चित करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या अध्यादेश क्र. २८/२०१७ (पुन्हा नव्याने निर्गमित केलेला अध्यादेश क्र. १/२०१८) च्या अनुषंगाने विद्यापीठाने प्रसृत केलेल्या निदेश क्र. २/२०१८ च्या तरतूदीनुसार, सोडतीच्या माध्यमातून प्रारंभिक आरक्षणाचा बिंदू मा.कुलगुरूंना निश्चित करावयाचा आहे. यानुषंगाने दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी सोडत काढण्यात येईल, अशी जाहीर सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर निर्गमित करण्यात आली.

सर्व संबंधितांच्या माहितीकरिता अधिसूचीत करण्यात येते की, सदहू निदेशातील तरतूदीनुसार, दिनांक २९ जानेवारी, २०१८ रोजी उपस्थितांच्यासमोर मा.कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेवरील प्रतिनिधित्व करणाऱ्या प्राचार्य, अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी व नोंदणीकृत पदवीधर यांचे प्रारंभिक आरक्षण बिंदू सोडत काढून खालीलप्रमाणे निश्चित केले.

| | | |
|---|---|---|
| १) प्राचार्य (Principals) | - | अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) |
| २) अध्यापक (Teachers) | - | अनुसूचित जाती (Scheduled Castes) |
| ३) व्यवस्थापन प्रतिनिधी (Representatives of Managements) | - | इतर मागास वर्ग (Other Backward Class) |
| ४) नोंदणीकृत पदवीधर (Registered Graduates) | - | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती)/भटक्या जमाती (De-notified Tribes (*Vimukta Jatis*) / Nomadic Tribes) |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ